N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** राळेगाव
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0325 **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/08/2023 00:41
2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार
      **Time Period (कालावधी):** पहर 6
      **Date From (दिनांक पासून):** 08/08/2023
      **Date To ( दिनांक पर्यत):** 08/08/2023
      **Time From (वेळेपासून):** 16:07 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 16:16 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 09/08/2023 **Time (वेळ):** 00:23 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 002
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/08/2023 00:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      दक्षिण, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** आकाश जनरल स्टोअर च्या समोर , राळेगांव ते वडकी रोडवर,राळेगाव , 445402

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. शंकर नानाजी डफ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हरी ओम नगर, प्रभाग क्र13, राळेगांव, ता राळेगांव, ,राळेगांव,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हरी ओम नगर, प्रभाग क्र13, राळेगांव, ता राळेगांव, ,राळेगांव,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आ.लो.से. शिशीर एकनाथ निनावे | | | 1. नवरगाव ,सिंधेवाही,सिंदेवाही, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | सांस्कृतिक मालमत्ता | पोषाख | हाफ बाह्याचा शर्ट | 0.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू. दराच्या 06 चलणी | 3,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

अँ.क.ब्युरो, यवतमाळ कॅम्प राळेगांव
दिनांकः-08/08/2023
फिर्याद

मी शंकर नानाजी डफ, वय 29 वर्ष, धंदा खाजगी वाहन चालक, रा. हरी ओम नगर, प्रभाग क्र. 13, राळेगांव, ता. राळेगांव, जिल्हा यवतमाळ नमुद पत्त्यावर माझे कुटुंबासह राहात असुन दिनांक 07/08/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय यवतमाळ येथे येउन लोकसेवक निनावे, मंडळ अधिकारी राळेगांव यांचे विरुध्द लाच मागणीची तक्रार पोलीस उप अधीक्षक उत्तम नामवाडे यांचे समक्ष दिली, ती खालील प्रमाणे आहे.
तक्रार
प्रति,
मा.पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतीबंधक विभाग,यवतमाळ.
अर्जदार:- श्री. शंकर नानाजी डफ, वय 29 वर्ष, धंदा खाजगी वाहन चालक, रा. हरी ओम नगर, प्रभाग क्र. 13, राळेगांव, ता. राळेगांव, जिल्हा यवतमाळ मो.क्र. 9923067587

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय यवतमाळ येथे हजर येवुन तक्रार देतो की, मौजा चिखली (वनोजा) येथे गट क्रमांक 176 प्रमाणे असलेली शेती ही मला माझे वडील नानाजी विठोबा डफ यांचे कडुन बक्षिसपत्रा व्दारे मिळाली होती. माझे वडील यांना कॅन्सरचा आजार झाल्यामुळे व त्यांचे उपचाराकरीता मला पैशाची गजर असल्याने मी सदरची शेती ही माझी बहीण नामे सौ. हेमलता संदिप चाफले, रा. आजनसरा यांना रूपये 8 लाखाला विकली होती. सदर शेतीचा फेरफार करणे बाकी होते सदरचा फेरफार करण्यासाठी मी प्रथमता संबधीत तलाठी यांचेकडे अर्ज केला होता. त्यानुसार त्यांनी संबधीत कागदपत्र बनवुन मंडळ अधिकारी श्री.निनावे यांचेकडे दिनांक 22/05/2023 रोजी दाखल केले होते. संबधीत कामकाजा संबधी मी मंडळ अधिकारी निनावे यांना सदरचे काम करून देण्यासाठी विनंती केली असता त्यांनी मागील आठवडयात 5000 रूपये लाचेची मागणी करीत आहेत. मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी त्यांचे विरुध्द आज रोजी लाच मागणीची तक्रार देत आहे. माझी व मंडळ अधिकारी श्री. निनावे यांचे मध्ये दुश्मनी नसुन देवाणघेवाणचा उसणवारीचा कोणताही व्यवहार आमचे मध्ये नाही. तरी मंडळ अधिकारी श्री. निनावे यांनी मला लाचेची मागणी केल्यास व स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी ही विनंती." अशी तक्रार दिली.
पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी दिनांक 07/08/2023 रोजी माझे तक्रारीची पडताळणी करणेकरीता निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ येथुन 1) श्री. महेश रामदास खोब्रागडे, जवान, व 2) श्री. प्रविण गणपत मसराम, जवान असे दोन शासकीय पंच बोलावले. यानंतर पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी दोन्ही पंचाना माझी व माझी पंचाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी पंचांना माझी तोंडी तक्रार सविस्तर सांगितली. पोलीस उप अधीक्षक श्री. नामवाडे यांनी माझे हस्ताक्षरातील लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. माझी तोंडी व लेखी तक्रारीतील मजकूर एकच असल्याची खात्री झाल्याने दोन्ही पंचांनी व पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली व पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी मला सांगितले की, मंडळ अधिकारी निनावे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन

कामासंबधाने चर्चा करावी. यावेळी पडताळणी कारवाई दरम्यान होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरव्दारे सॅनडिस्क कंपनीचे 32 जी.बी.मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगुन सविस्तर कार्यवाही मला व पंचाना समजावुन सांगीतली. माझे विनंतीवरुन तक्रारीची पडताळणी दिनांक 08/08/2023 रोजी करण्याचे ठरले. सविस्तर कारवाई दिनांक 07/08/2023 रोजीचे पडताळणी पुर्व पंचनामा प्रमाणे करण्यात आली.

दिनांक 08/08/2023 रोजी मी राळेगांव शहरात बाहेरील राळेगांव ते सोनुर्ली रोड जवळ हजर असतांना पोलीस उप अधीक्षक नामवाडे, पंच व स्टापसह शासकीय वाहनाने तेथे आले. यानंतर पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सॅनडीस्क कंपनीचे 32 जीबीचे मेमरी कार्ड टाकले व व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टचे आतमध्ये लटकविला, ती वेळ 14.31 वा. ची होती. मला व पंच क्र. 1) श्री. खोब्रागडे यांना माझेकडील दुचाकी वाहनाने मंडळ अधिकारी श्री. निनावे यांची भेट घेणेकरीता राळेगाव कडे रवाना केले. पंच क्र. 2) श्री. मसराम हे पडताळणी पथकाजवळ थांबुन होते. मी पंच क्र. 1 यांचेसह मंडळ अधिकारी कार्यालय राळेगांव येथे जावुन पंचा समक्ष श्री. निनावे, मंडळ अधिकारी यांची भेट घेतली व त्यांचे सोबत कामासंबंधाने चर्चा केली. चर्चेदरम्यान श्री. निनावे, मंडळ अधिकारी यांनी पंचासमक्ष मला माझी बहीण नामे सौ. हेमलता संदिप चाफले, रा. आजनसरा यांना रूपये 8 लाखाला विक्री केलेल्या शेतीचा फेरफार मंजुर करणेकरीता तडजोडी अंती 3,000/- रूपये लाचेची मागणी केली व लाच रक्कम आज दिनांक 08/08/2023 रोजी लवकर स्विकारण्याचे मान्य केले. यानंतर मी, व पंच क्र. 1) श्री. खोब्रागडे यांचेसह पडताळणी पथकाजवळ परत आलो. पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर घेउन बंद केला, ती वेळ 14.59 वाजताची होती. यानंतर विचारल्यावरुन मी व पंच क्र. 1 यांनी घडलेली सविस्तर हकीकत पंचासमक्ष सांगितली. व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. लोकसेवक निनावे यांनी लाच रक्कम लवकर घेवुन बोलाविल्याने सर्वानुमते सापळा कारवाई करण्याचे ठरले. यानंतर दिनांक 08/08/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांचे सुचनेवरून पंच व मला अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्रावायलेट लॅम्पचे गुणधर्म समजावुन सांगितले व मी कारवाई दरम्याण दिलेल्या 500/- रूपये दराच्या 06 नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी सापळा कारवाई दरम्याण घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या व निनावे मंडळ अधिकारी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास मी माझा डावा हात स्वतःचे डोक्यावरुन वारंवार फिरवावा असा ईशारा सांगीतला. यानंतर पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी सिलबंद असलेले सॅनडिस्क कंपनीचे 32 जी.बी.मेमरी कार्ड काढले व व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे व पंचासमक्ष टाकले. सविस्तर सापळापुर्वची कारवाई करण्यात आली.

यानंतर दिनांक 08/08/2023 रोजी मी निनावे मंडळ अधिकारी यांना फोन करुन पैसे घेवुन कुठे येवु याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला राळेगांव येथील मटण मार्केट येथे पैसे घेउन बोलाविल्याने, पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी राळेगांव ते सोनुर्ली रोड येथुन व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टचे आतमध्ये लेसव्दारे लटकवीला, ती वेळ 16.07 वाजताची होती. त्यांनतर पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी मला माझे दुचाकी वाहनाने निनावे मंडळ अधिकारी यांची भेट घेणे करीता राळेगांव येथील मटन मार्केटकडे रवाना केले व लगेच पंच क्र. 1 व पोलीस उप अधीक्षक व कर्मचारी हे दुचाकी वाहन व शासकिय चारचाकी वाहनाने माझे मागे मागे रवाना झाले. दरम्यान माझे मोबाईलवर लोकसेवक श्री. निनावे यांनी फोन करून लाचेची रक्कम घेवुन मटन मार्केट समोर लवकर बोलाविले. मी मटन मार्केटकडे जात असतांना राळेगांव ते वडकी रोडवर श्री. निनावे मंडळ अधिकारी यांनी मला बघितले व बोलाविले. यानंतर मी आकाश जनरल स्टोअर च्या समोर राळेगांव ते वडकी रोडवर श्री. निनावे, मंडळ अधिकारी यांची भेट घेतली, तेव्हा पंच क्र. 1) खोब्रागडे हे जवळपास उभे होते व सापळा पथक आजुबाजुला हजर होते. निनावे, मंडळ अधिकारी यांनी मला ईशा-याने लाचेची मागणी केली असता मी माझे पॅन्टच्या खिश्यामध्ये ठेवलेली अॅन्थ्रासीन पावडर लागलेली लाचेची रक्कम 3,000/- रुपये माझे उजवे हाताने बाहेर काढुन निनावे, मंडळ अधिकारी यांना दिली असता, निनावे मंडळ अधिकारी यांनी 3,000/- रूपये लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे शर्टचे समोरील डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. यानंतर मी माझा डावा हात डोक्यावर वारंवार फिरवला व पुर्वनियोजीत ईशारा सापळा पथकास केला. लगेच पोलीस उप अधीक्षक नामवाडे व पथकातील कर्मचारी यांनी तेथे येऊन निनावे मंडळ अधिकारी यांचे दोन्ही हात पकडुन त्यांना ताब्यात घेतले व माझेजवळील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेउन बंद केला, ती वेळ 16.16 वा. होती. लाचेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहण्यात आले. विश्रामगृह राळेगांव येथे निनावे मंडळ अधिकारी यांचे हात, लाचेच्या नोटा व माझे हात अल्ट्राव्हॉईलेट दिव्याचे प्रकाशात तपासण्यात आले.

आरोपी लोकसेवक शिशीर एकनाथराव निनावे, मंडळ अधिकारी यांनी दिनांक 08/08/2023 रोजी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष मला माझी बहीण नामे सौ.हेमलता संदिप चाफले रा. आजनसरा यांना रूपये 8 लाखाला विकलेल्या शेतीचा फेरफार मंजुर करणेकरीता तडजोडी अंती 3,000/- रुपये लाचेची मागणी करून दिनांक

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**

08/08/2023 रोजी 16.07 वाजता ते 16.16 वाजता सापळा कार्यवाही दरम्यान आ.लो.से. शिशीर एकनाथ निनावे, मंडळ अधिकारी यांनी आकाश जनरल स्टोअर च्या समोर राळेगांव ते वडकी रोडवर माझेकडुन पंचासमक्ष 3,000/- रूपये लाच रक्कम स्विकारली, त्यावेळी पोलीस उप अधीक्षक नामवाडे व स्टाफ यांनी त्यांना लाच रकमेसह रंगेहात पकडले. सविस्तर कार्यवाही दिनांक 08/08/2023 रोजीचे पंचनामा प्रमाणे करण्यात आली. त्यावरुन आ.लो.से. शिशीर एकनाथ निनावे, वय 38 वर्ष, पद मंडळ अधिकारी, नेमणुक तहसिल कार्यलय राळेगांव, ता. राळेगांव जिल्हा यवतमाळ यांचेविरूध्द कायदेशीर कार्यवाहीस्तव तक्रार देत आहे.
माझी वरीलप्रमाणे तक्रार मराठीत टंकलीखीत केली असुन, मी अँ.कं.ब्युरो पथकासह पोलीस स्टेशन राळेगांव येथे येऊन तक्रार देत आहे, सदर तक्रार मला वाचुन दाखविण्यात आली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAMKRISHNA PAHADSING JADHAO(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
पो.स्टे. राळेगांव

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAMKRISHNA PAHAD
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API